# मिरा भाईंदर महानगरपालिका

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धपत्रक**

- **एकल प्लास्टिक वापर आणि अस्वच्छता करण्यावर कडक कारवाई**
- **एकूण रू. 6500/- हजाराची दंड वसुली**

भाईंदर (प.), शुक्रवार :- शहरातील एकल प्लास्टिक पिशवी वापर आणि अस्वच्छता करण्या-या नागरिकांविरोधात आज दि. 7.03.2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या घनकचरा विभागामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत ७ किलो ग्रॅम इतके एकल प्लास्टिक जप्त करण्यात आले असून एकूण ६५००/- रू. दंड वसुल करण्यात आले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या घनकचरा विभागामार्फत शहरात अस्वच्छता व एकल प्लास्टिक वापर करणा-या नागरिकांविरोधात कडक कारवाई करण्यात येत असते. प्रभाग समिती क्र.02 (भाईंदर प.) चे स्वच्छता निरीक्षक श्री. रविंद्र पाटील, सब स्वच्छता निरीक्षक श्री. हितेश पाटील व सुशील राठोड, मुकादम श्री. अशोक भोईर, श्री. भरत घरत व त्यांच्या पथकामार्फत कारवाई करून ७ किलो ग्रॅम एकल प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आले आहे. प्लास्टिक विक्रेते वंदना दोशी यांच्यावर दंडात्मक कारवाईकरून रक्कम रू. ५०००/- इतके वसूल करण्यात आले. तसेच व्यावसायिक, दुकाने, फरसाण मार्ट व इतरत्र अस्वच्छता करणा-यांवर कारवाई करून रू. १४००/- दंड वसूली करण्यात आले. यासोबत उघड्यावर लघु शंका करणा-यावर रू. १००/- दंड वसूली करण्यात आले. एकूण दंड रक्कम रू. ६५००/- वसुल करण्यात आले.

मिरा भाईंदर शहरातील अस्वच्छता आणि एकल प्लास्टिक वापर कमी करण्याच्या हेतूने सदरची कारवाई करण्यात आली आहे. याद्वारे शहरात अस्वच्छता आणि एकल प्लास्टिक वापर करणा-यांवर चाप बसून शहर स्वच्छ व पर्यावरण पूरक होण्यास नक्की मदत होणार आहे. तसेच शहारातील नागरिकांनी एकल प्लास्टिकचा वापर करू नये तसेच शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यात सहकार्य करावे असे महानगरपालिकेमार्फत आवाहन करण्यात येत आहे.